# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U/ 93 / 2008 / 14** **Date :- 19.03.2008**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**<u>Aurangabad.</u>**

Sub:- Forwarding of grievance in respect of Smt. Kalawati S.Tote
Flat No. 1, Gangotri Apartment , Jalan Nagar Aurangabad.
**(Consumer No. 490011697582)**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from** Smt. Kalawati S.Tote Flat No. 1, Gangotri Apartment , Jalan Nagar Aurangabad.

You are requested to submit Your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter. T**he hearing is fixed on 08.04.2008 at 11.30 hrs .**

.

**Encl A/A**

.

**Copy to :-**
Smt. Kalawati S.Tote
Flat No. 1, Gangotri Apartment ,
Jalan Nagar Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/९३/२००८/१४**

**तक्रार दाखल दिनांक ;-१९/०३/२००८**
**निकाल दिनांक ;- १७/०५/२००८**

**सौ,कलावती शंकर तोटे,**
**प-लॅट नं,१, प्लॉट नं ५३,**
**गंगोत्री अपार्टमेंट,जालाननगर,**
**रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.**

अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार

दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक १९/०३/२००८ रोजी दाखल केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक १९/०३/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

१) ग्राहकाने दाखल केलल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.
अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांना मीटर लावल्यापासुन मीटरवरील नोंदीप्रमाणे बिल न देता सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आले. याबाबत अर्जदाराने महावितरण कंपनीच्या छावणी उपविभागाकडे तक्रार केली होती पण त्यांच्या तक्रारीची दखल न घेतली गेल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली आहे.

२) दिनांक ०८/०४/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदाराचे प्रतिनिधी श्री शंकर तोटे हजर होते. नोडल अधिकारी श्री एस.जी.पवार महावितरणतर्फे हजर होते. संबंधित प्रकरणाची कागद पत्रे छावणी उपविभागाकडून त्यांना प्राप्त झाले नसल्याचे सांगत त्यांनी सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती मंचास केली. मंचाने विनंती मान्य करून सुनावणी १५/०४/२००८ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक १५/०४/२००८ रोजी नोडल अधिकारी यांनी पुन्हा एकदा कागदपत्रे प्राप्त न झाल्याचे कारण सांगून सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याची विनंती केली. मंचाने नोडल अधिकारी यांना त्यांचा जबाब दाखल करण्याची शेवटची संधी देत पुढील सुनावणी दिनांक १३/०५/२००८ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक १३/०५/२००८ रोजी नोडल अधिकारी यांनी अर्जदारास देण्यात येणारे सुधारीत बिलाची प्रत मंचात दाखल केली. सदरील सुधारीत बिल हे कोणत्या आधारावर तयात करण्यात आले या बाबत मंचाने विचारणा केली असता ते उपलब्ध नसल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगितले. मंचाने त्यांना ते दोन दिवसात दाखल करण्याचे सांगून प्रकरण निकालासाठी राखून ठेवले.

५) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागदप्त्रावरून व सी.पी.एल.चे निरीक्षण केल्यावर असे आढळून येते की, महावितरण कंपनीने अर्जदारास मे २००५ मध्ये घरगुती वापरासाठी वीज पुरवठा केला. अर्जदाराच्या येथे बसविण्यात आलेल्या मिटरचा क्रमांक ४०२११०५३६ असा आहे. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास खालिलप्रमाणे वीज बिल आकारल्याचे दिसुन येते.

| अ.क्र. | कालावधी | मागिल रिडींग | चालू रिडींग | वीज वापर युनिट | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | जुन२००५ ते सप्टें.२००५ | ० | ० | ० | वीज बिल दिले नाहीत |
| २. | ऑक्टो.२००५ | ५७०५ | ५७०५ | ० | सरासरी २८८ युनिटचे बिल |
| ३. | नोव्हे.२००५ | ५७०५ | ६२१२ | ५०७ | सहा महिन्याचे वीज बिल |
| ४. | डिसें.२००५ते मे २००७ | ६२१२ | ६२१२ | --- | सरासरी ८४ युनिट चे वीज बिल |
| ५. | जुन २००७ ते सप्टें.२००७ | ६२१२ | ६२१२ | --- | सरासरी ५० युनिट चे बिल |
| ६. | ऑक्टो. २००७ ते जाने.२००८ | ६२१२ | ६२१२ | -- | सरासरी ८४ युनिट चे वीज बिल |
| ७. | फेब्रु.२००८ | ६२१२ | ११९९८ | ५७८६ | --- |

अर्जदाराच्या सी.पी.एल. वर जरी ४०२११०५३६ व ०००१०५३६ असे दोन वेग वेगळे मिटर क्रमांक दिसत असलेतरी सुनावणी दरम्यान अर्जदार व नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे मिटर बदलण्यात आले नसल्याचे तसेच हे मिटर व्यवस्थित नोंद घेत असल्याचे स्पष्ट केले.

६) अर्जदारास मे २००५ मध्ये वीज पुरवठा केल्यानंतर जुन २००५ ते सप्टेंबर २००५ या काळात मागिल रिडींग व चालू रिडींग शुन्य अशी दाखविण्यात आला. यावरून मिटर बसवितांना सुरवातीची रिडींग बाबत बोध होत नाही. नोव्हेंबर २००५ या महिण्यात मागिल रिडींग व चालू रिडींग ही अनुक्रमे ५७०५ व ६२१२ अशी दाखविण्यात आली असून नोव्हेंबर २००५ चे ५०७ युनिट वीज वापराचे बिल हे सहा महिन्याचे असल्याचे आढळून येते. यावरून अर्जदाराच्या येथे मे २००५ मध्ये मिटर लावतांना त्यावरील रिडींग ५७०५ अशी होती असा निष्कर्ष काढता येतो.

७) महावितरण कंपनीने अर्जदारास डिसेंबर २००५ ते जानेवारी २००८ या काळात मिटर व्यवस्थित चालत असतांना सुध्दा मिटर वरिल नोंदीप्रमाणे वीज बिल न आकारता सरासरीवर आधारीत वीज बिल दिल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने तक्रार केल्यानंतरही त्याच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही.यावरून महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात येणा-या सेवेबाबत बेजबाबदारपणा व त्रुटी दिसुन येते.

८) वरिल निरीक्षणावरून असे अढळून येते की,मे २००५ मध्ये अर्जदाराच्या येथे लावण्यात आलेल्या मिटरची रिडींग ही ५७०५ अशी होती व फेब्रुवारी २००८ मध्ये ती ११९९८ अशी होती म्हणजेच अर्जदाराचा या

९) काळातील एकूण वीज वापर हा ११९९८-५७०५ - ६२९३ युनिट आहे तसेच ६२९३/३१ महिने - २०३ युनिट प्रति माह असा आहे. अर्जदाराच्या सी.पी.एल.वरून फेब्रुवारी २००८ मध्ये अर्जदारास रूपये ९९६६/- चे क्रेडिट दिले असल्याचे आढळून येते. तसेच मार्च २००८ अखेर ग्राहकाचे थकीत वीज बिल रूपये ६६३९/-चे असल्याचे आढळते जे की योग्य दिसत असले तरी त्यात व्याज व दंड रद्द करण्यात आल्याचा तपशील नोडल अधिकारी यांनी मंचाच्या मागणिवरून सुध्दा दाखल केलेला नसल्यामुळे ते स्पष्ट होत नाही.

मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास व्याज वा दंड न लावता सुधारीत वीज बिल ३० दिवसाच्या आत द्यावे व ते अर्जदाराने सुधारीत वीज बिल मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत भरणा करावा. .

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया**<br>**सदस्य** | **विजय गो. जोशी**<br>**सदस्य/सचिव** | **विष्णु अ. हंबिरे**<br>**अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/९३/२००८/१४** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) सौ,कलावती शंकर तोटे,**
**प-लॅट नं,१, प्लॉट नं ५३,**
**गंगोत्री अपार्टमेंट,जालाननगर,**
**रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/९३/२००८/१४
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

१०) दिनांक ०२/०४/२००८ रोजी ग्राहक प्रतिनिधी श्री मोहन कुलकर्णी तसेच नोडल अधिकारी श्री जे. जी. जैस्वाल,श्री एम.एन.ओव्हळ,सहाय्यक अभियंता हजर होते.नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा वीज पुरवठा कोणतीही पुर्वसुचना न देता खंडीत केल्याचे मान्य केले. वीज बिलाच्या थकित रक्कमेचा आढावा घेवून अर्जदाराने रुपये १०००/- भरल्यानंतर २४ तासांच्या आत त्याचा वीज पुरवठा पुनर्जोडणी करण्याचा अंतरीम आदेश मंचाने पारीत केला व या बाबतची पुढील सूनावणी दिनांक १५/०४/२००८ रोजी ठेवण्यात आली.